# नियमित दिवाणी दावा क्रमांक ५६/२०१६ (सीएनआर क्र.एमएचओएस १५००००९१२०१६) (विजयकुमार गोडसे वि. दत्तात्रय पाटील व इतर) मधील नि.क्र.४३ येथील अर्जावरील आदेश.

वादीने प्रस्तुचा अर्ज दिवाणी प्रक्रीया संहीता १९०८ चे आदेश ६ नियम १७ अन्वये अर्जातील परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र. १ व ६ यांनी म्हणणे दाखल करुन अर्जास प्रतिरोध केला आहे.

प्रस्तुत अर्ज, अर्जासोबतचे शपथपत्र, अर्जावरील प्रतिवादी क्र.१ व ६ यांचे म्हणणे आणि अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले. उभय पक्षांच्या सन्माननीय विधिज्ञांचे युक्तिवाद ऐकले.

अर्जामध्ये व शपथपत्रामध्ये नमूद करण्यात आले आहे की, दावा प्रलंबीत असताना प्रतिवादी क्र.५ हा दिनांक ०१/०१/२०१८ रोजी मयत झाला असून दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१ ते ४ व ६ हे प्रतिवादी क्र.५ चे वारस समाविष्ट असून प्रतिवादी क्र.५ च्या आणखी तीन मुली वारसदार असून त्यांना अभिलेखावर घेवून त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.१ व ६ असा आक्षेप घेतला आहे की, प्रस्तुत अर्ज मंजूर होणेस पात्र नामंजूर करावा.

वादपत्राचे अवलोकन करता वादीने प्रस्तुतचा दावा तो दावा मिळकतीच्या मालक व कब्जेवहीवाटदार असल्याची व नि.दि.दावा क्र.०४/१९९४ मधील मे.दिवाणी न्यायालय क. स्तर,परंडा यांचा दिनांक २६/०४/२००२ रोजीचा हुकूमनामा वादीवर बंधनकारक नसल्याची घोषणा करुन प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी स्वत: व इतरांमार्फत वादीचे दावा मिळकतीवरील कब्जेवहीवाटीस हरकत व अडथळा करु नये असा निरंतर मनाई हुकूम पारीत करणेसाठी दाखल केला आहे. वादीने अर्जातील कथनाच्या पृष्ट्यर्थ नि.क्र.४४ येथे शपथपत्र दाखल केले असून नि. क्र.४६ च्या यादीसोबत सरपंच व ग्रामसेवक,ग्रामपंचायत लोहारा यांनी प्रतिवादी क्र.५ दगडू पाटील यांचे दिलेले मृत्यू प्रमाणपत्र आणि पोलीस पाटील, मौजे लोहारा यांनी दिलेले वारस प्रमाणपत्र हे दस्तऐवज दाखल केले आहेत. प्रतिवादी क्र.१ व ६ यांनी अर्जास आक्षेप घेतला असला तरी प्रतिवादी क्र.५ मयत झाले व त्यांना प्रतिवादी क्र.१ ते ४ व ६ आणि अर्जातील नमूद तीन मुली हे वारस आहेत या बाबीं स्पष्टपणे नाकारलेले नाहीत. वादीने प्रस्तुत अर्जामध्ये प्रस्तावित केलेल्या दुरुस्तीचे अवलोकन करता दाव्याचे दरम्यान प्रतिवादी क्र.५ दगडू पाटील मयत झालेने त्यांचे मुलींना वारस म्हणून अभिलेखावर घेवून त्या अनुषंगाने अर्जात नमूद केल्याप्रमाणे मजकूर

वादपत्रामध्ये समाविष्ट करुन दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे. अशा परिस्थितीमध्ये वादीने प्रस्तावित केलेल्या दुरुस्तींचे अवलोकन करता त्याने अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे सुचित केलेली दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याच्या स्वरुपामध्ये बदल होईल व प्रतिवादीपक्षाचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता आहे अशी परिस्थिती प्रतिवादी पक्षातर्फे दर्शविण्यात आलेली नाही. प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादीपक्षाचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता आहे. प्रस्तूत प्रकरणातील उभय पक्षांमधील वादांचे पूर्णपणे निराकरण करणेकामी वादीने प्रस्तावित केलेली दुरुस्ती करण्यास परवानगी देणे न्यायोचित होईल. त्यामुळे उपरोक्त नमूद विश्लेषणाचे काळजीपूर्वक अवलोकन करता प्रस्तुत अर्जाद्वारे वादपत्रामध्ये दुरुस्ती करणेबाबत वादीने केलेली विनंती मंजूर करणे क्रमप्राप्त ठरेल. परिणामत: मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

---

## आदेश

---

१ प्रस्तुतचा अर्ज खालील प्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२ अर्जातील परिच्छेद क्र.२ मध्ये प्रस्तावित केलेली दुरुस्ती वादपत्रामध्ये करण्यास वादीला परवानगी देण्यात येते.

२ खर्चाबाबत आदेश नाही.

३ प्रस्तुतच्या आदेशाचे निवेदन खुल्यान्यायासनासमोर अधिघोषित करण्यात आले.

सही/—

दिनांक — १२/०१/२०१८

**(एस.एस.पाटील)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर परंडा,**
**जि.उस्मानाबाद.**